तणनियंत्रण

# खरीप पिकातील तणांचा वेळीच करा नायनाट



**प्रा. संजय बडे**
(मो.नं.७८८८२९७८५९)
दादासाहेब पाटील कृषी महाविद्यालय,
दहेगाव, ता. वैजापूर,
जि. छत्रपती संभाजीनगर



तणांना निसर्गानेच काही अशी वैशिष्ट्ये दिली आहेत की, आपण वर्षानुवर्षे अनेक उपाय योजूनही ती आजही तग धरून आहेत. त्यांचा नायनाट होत नाही. प्रचंड बीजोत्पादन क्षमता, बियाण्यांची सुप्तावस्था, प्रतिकूल परिस्थितीत वाढण्याची क्षमता, कमी कालावधी, लवकर फळे- फुले लागणे, सहज प्रसार या गुणधर्मांमुळे तणे पिकांच्या उत्पादनात घट आणतात. त्यामुळे त्यांचा बंदोबस्त करणे गरजेचे असते.

**शे**तातील उत्पादन वाढविण्यासाठी कृषी निविष्ठांचा योग्य वापर करून अधिकाधिक उत्पादन मिळविणे आज आवश्यक बनले आहे. त्यापैकी तण व्यवस्थापन ही एक महत्त्वाची बाब आहे. पिकाच्या सुरूवातीच्या वाढीच्या काळात तणनियंत्रणाची विशेष काळजी घेतल्यास नुकसान कमी प्रमाणात होते. तणांमुळे मूळ पिकाची पाणी, अन्नद्रव्ये व जागेसाठी स्पर्धा होते, ही बाब या संदर्भात लक्षात घेतली पाहिजे.

**खरीप पिकांत वाढणारी विविध तणे**

अ) एकदलवर्गीय तणे : लोणा, केना, भरड, शिप्पी, चिकटा, हराळी, लव्हाळा, कुंदा, चिमणचारा, वाघनखी इत्यादी.

ब) व्दिदलवर्गीय तणे : दीपमाळ, दुधी, माठ, काटेमाठ, कुंजरू, हजारदाणी, तांदुळजा, रानताग, पेटारी, शेवरा, पाथरी, चांदणवेल, कुरूडू, गाजर गवत, उन्हाळी इत्यादी.

**तणांची वैशिष्ट्ये** : तणांना निसर्गानेच काही अशी वैशिष्ट्ये दिली आहेत की, आपण वर्षानुवर्षे अनेक उपाय योजूनही ती आजही तग धरून आहेत. त्यांचा नायनाट होत नाही. प्रचंड बीजोत्पादन क्षमता, बियाण्यांची सुप्तावस्था, प्रतिकूल परिस्थितीत वाढण्याची क्षमता, कमी कालावधी, लवकर फळे- फुले लागणे, सहज प्रसार या गुणधर्मांमुळे तणे पिकांच्या उत्पादनात घट आणतात. त्यामुळे त्यांचा बंदोबस्त करणे गरजेचे असते.

खरीप पिकांतील पीक तण स्पर्धेचा काळ : मका (१५ ते ३५ दिवस), भात (१५ ते ४५ दिवस), ज्वारी (१५ ते ४५ दिवस), बाजरी (२५ ते ४५ दिवस), सोयाबीन (१५ ते ४५ दिवस), उडीद (३० ते ४५ दिवस). सदर पीक व तण स्पर्धेचा काळ मोजताना पेरणीनंतरचे दिवस गृहीत धरावे.

**तणांमुळे होणारे नुकसान**

| अ.क्र. | खरीप पीक | नुकसान (टक्के) |
|---|---|---|
| १ | भात | २५ ते ४० |
| २ | मका | ४९ |
| ३ | खरीप ज्वारी | ६० ते ७० |
| ४ | बाजरी | २५ ते ४० |
| ५ | ऊस | ४० ते ६० |

**तणांमुळे होणारे नुकसान** : १) पिकांच्या दर्जात होणारी घट २) पिकांच्या उत्पादनात येणारी घट ३) पीक उत्पादन खर्चात होणारी वाढ ४) तणे मनुष्यालाही अपाय करतात ५) कीटक व रोगांना आसरा देतात ६) तण शेती अवजारांची झीज करतात ७) तणे जमिनीची किंमत कमी करतात ८) पाण्याच्या पाटाची वहनक्षमता कमी होते. तणांचा प्रसार झपाट्याने होत असल्यामुळे त्यांचे वेळीच नियंत्रण करणे आवश्यक आहे.



**तणांचा बंदोबस्त करण्याच्या पद्धती**

१) **प्रतिबंधात्मक उपाय** : १. स्वच्छ बी-बियाणे वापरणे २. चांगले कंपोस्ट व शेणखत वापरणे ३. बी धरण्यापूर्वी तणांचे रोपटे काढून टाकावे ४. तणांची वाढ नाहीशी करणे ५. शेताचे बांध, पाण्याचे पाट, चर व भोवतालचे रस्ते तणांपासून मुक्त ठेवावेत ६. अवजारांपासून तणांचा प्रसार रोखण्यासाठी तणयुक्त शेताची मशागत केल्यानंतर अवजारे स्वच्छ करून दुसऱ्या शेताकडे न्यावीत.

२) **निवारणात्मक उपाय** : यामध्ये हाताने वापरावयाची अवजारे, बैलाच्या किंवा ट्रॅक्टरच्या साहाय्याने ओढली जाणारी मशागतीची अवजारे यांचा समावेश होतो. हाताने तण उपटणे तसेच हात कोळपणी - खुरपणी करून तण काढणे व खांदणी करणे. पिकांच्या दोन ओळीत आच्छादनाचा वापर करून तणांचा बंदोबस्त करता येतो.



| विविध खरीप पिकांसाठी शिफारशीनुसार तणनाशके | | | | |
|---|---|---|---|---|
| अ. क्र. | पिकाचे नाव | तणनाशक | प्रमाण प्रति १० लि. पाणी | वापरण्याची पद्धत |
| १ | सोयाबीन | पेंडीमिथॅलिन ३८.७ टक्के सी.एस. | २० ते ३५ मि.लि. | उगवणीपूर्व |
| | | इमॅझिथायपर १० टक्के डब्ल्यू.एस.एल. | २० मि.लि. | उगवणीपश्चात |
| २ | मका | ॲट्रॅझिन ५० डब्ल्यू.पी. | १५ ते ३० ग्रॅम | उगवणीपूर्व |
| ३ | भुईमूग | इमॅझिथायपर १० टक्के एस.एल. | २० ते ३० मि.लि. | उगवणीपूर्व/ उगवणीपश्चात |
| ४ | तूर | पेंडीमिथॅलिन ३० टक्के ई.सी. | ३५ ते ५० मि.लि. | उगवणीपूर्व |
| ५ | कापूस | पेंडीमिथॅलिन ३८.७ टक्के सी.एस. | २० ते २५ मि.लि. | उगवणीपूर्व |
| | | पायरिथोओबॅक सोडियम १० टक्के ई.सी. | १२ ते १५ मि.लि. | उगवणीपूर्व |
| ६ | ऊस | मेटासल्फ्युरॉन मिथिल ३० टक्के डब्ल्यू.पी. | ०.६ ग्रॅम | उगवणीपश्चात (३० ते ४० दिवस) |

३) **जैविक तणनियंत्रण :** या पद्धतीमध्ये कीटकांव्दारे, जीवजंतूंव्दारे (बुरशी, जिवाणू, विषाणू व सूत्रकृमी इत्यादी) तसेच परोपजीवी वनस्पतींव्दारे तणांचे नियंत्रण केले जाते. उदा. कोचिनियल किडीचा वापर करून निवडुंगाचा नाश करता येतो तसेच गाजर गवताच्या नियंत्रणासाठी मेक्सिकन भुंग्यांचा वापर करता येतो.

४) **रासायनिक पद्धतीने तणांचा बंदोबस्त :** निरनिराळी उपयुक्त रसायने वापरून तणांचा बंदोबस्त करता येतो. या पद्धतीमध्ये जी रसायने वापरली जातात त्यांना तणनाशके असे म्हणतात. रासायनिक पद्धतीने तणनियंत्रण करताना काही महत्त्वाच्या तांत्रिक बाबी पुढीलप्रमाणे–

१) लेबल क्लेमनुसार तणनाशकाची निवड व वापर करणे २) तणनाशकाचा शिफारस केलेल्या मात्रेइतकाच वापर





करणे, त्यापेक्षा कमी अथवा अधिक वापर टाळणे, तणनाशक फवारणी पद्धतीनुसार नोझलचा वापर करणे, योग्य वेळी तणनाशकाची फवारणी उदा. पीक व तणे उगवणीपूर्वी तसेच उगवणीपश्चात पिकावर आणि तणांवर फवारणी करणे.

**तणनाशक फवारणीच्या वेळी घ्यावयाची दक्षता**

१) फवारणीसाठी शक्यतो स्वतंत्र पंप वापरावा.

२) तणनाशक फवारणीपूर्वी जमिनीत पुरेसा ओलावा असावा.

३) फवारणी पंपासाठी शिफारशीनुसार नोझलचा वापर करावा.

४) फवारणीसाठी स्वच्छ पाण्याचा वापर करावा, गढूळ व गाळयुक्त पाणी वापरू नये.

५) उभ्या पिकात तणनाशके फवारताना हूडचा वापर करावा. ■